सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, अमरावती.

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.

Email :-roamravati@dtemaharashtra.gov.in Web :- www.jdroamt.org

Phone :- 0721- 257 3027, 2572577 Fax :- 0721- 257 7913

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

---

**महत्वाचे / कालमर्यादीत**

जा.क्रमांक.:- विकाअ/शिक्षण/२०२५/ 1714

दिनांक :- 19 JUN 2025

**प्रति,**

**प्राचार्य,**
सर्व व्यावसायिक तांत्रिक पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या विद्यमान संस्था,
अमरावती विभाग, अमरावती.

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील तांत्रिक व्यावसायिक पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या केन्द्रीभूत (CAP) प्रवेशासाठी संस्थांची माहिती पडताळणी करुन अद्ययावत करणेबाबत.**

**संदर्भ :-** १. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांचे परिपत्रक क्रमांक २/एनजीसी/Intake Approval/२०२५/५०९ दिनांक १७/०६/२०२५.

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांचे शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील तांत्रिक व्यावसायिक पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या केन्द्रीभूत (CAP) प्रवेशासाठी संस्थांची माहिती पडताळणी करुन अद्ययावत करणेबाबतचे संदर्भीय पत्र सोबत जोडले आहे. कृपया त्याचे अवलोकन करुन त्याप्रमाणे आवश्यक कार्यवाही करावी.

त्यानुषंगाने आपणास कळविण्यात येते की, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली व कौसिल ऑफ आर्कीटेक्चर, नवी दिल्ली यांच्याकडून मान्यताप्राप्त संस्थांमधील पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांसाठी शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता संबंधीत शिखर परिषदेची मान्यता, शासन मान्यता, त्यानुसार संबंधीत विद्यापिठाची सलग्नता / समकक्षता प्रदान केल्याची माहिती अद्ययावत करुन **दिनांक २७/०६/२०२५ ला सायंकाळी ५ वाजेपर्यंत** ऑनलाईन पध्दतीने सादर करुन आवश्यक कागदपत्रासह या कार्यालयात उपस्थित राहावे. कोणत्याही संस्थेची माहिती अद्ययावत करणे प्रलंबित राहिल्यास व त्यामुळे संस्थेचा समावेश केन्द्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या पहिल्या फेरीमध्ये न झाल्यास, त्याची संपूर्ण जबाबदारी संस्थेची राहिल. तसेच मंजूर प्रवेश क्षमतेची माहिती ही प्रवेश प्रक्रियेदरम्यान जागा वाटपात दर्शविण्यात येणार असल्याने सदर माहितीत कोणतीही चूक झाल्यास व पर्यायाने प्रवेश प्रक्रियेमध्ये काही अडचण उद्भवल्यास त्यास संबंधीत संस्थेचे प्राचार्य सर्वस्वी जबाबदार राहतील.

**सहपत्र :-** वरील प्रमाणे.

(मनोज म. अंधारे)
**प्र.सहसंचालक तंत्रशिक्षण,**
अमरावती.

प्रत :- प्रोग्रामर, तंत्राशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना कळविण्यात येते की, सदर माहिती प्रवेशासंबंधी असल्याने विशेष दक्षता घेवून online approved करावे तसेच संकेतस्थळावर टाकण्याकरीता.

महाराष्ट्र शासन
**तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य**
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४७५, ४६५, ४९२, ४४२, ४४३, ४४७
ई-मेल - desk2@dtemaharashtra.gov.in वेबसाईट : http://www.dte.maharashtra.g

परिपत्रक

क्रमांक : २ /एनजीसी/Intake Approval/२०२५/५०९ दिनांक : 17 JUN 2025

प्रति,

प्राचार्य / संचालक

सर्व व्यावसायिक तांत्रिक पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या विद्यमान संस्था

विषय :-शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील साठी तांत्रिक व्यावसायिक पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत (CAP) प्रवेशासाठी संस्थांची माहिती पडताळणी करुन अद्ययावत करणेबाबत..

संदर्भ : १)संचालनालयाचे परिपत्रक क्र.२/Intake Approval/२०२५/४१८, दि.२३.५.२०२५
३)शासन पत्र क्र.E-No.११३९५१७/MHT/(TE-५), दि.१६.६.२०२५

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया व वास्तुकला परिषद अशा शिखर परिषदांद्वारे शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करीताची मान्यता प्रक्रिया सुरु असुन पदविका अभ्यासक्रम राबविणाऱ्या संस्थांना या शिखर परिषदांद्वारे मान्यता प्रक्रियेची कार्यवाही सुरु आहे. त्याअनुषंगाने आपल्या संस्थेतील पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांसाठी शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता संबंधित शिखर परिषदेची मान्यता, शासन मान्यता त्यानुसार विद्यापीठाची संलग्नता / समकक्षता प्रदान केल्याची माहिती अद्ययावत करुन दि.१५ जुन २०२५ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत ऑनलाईन पध्दतीने सादर करण्याबाबत संचालनालयाच्या संदर्भाधीन परिपत्रकान्वये निर्देशित करण्यात आले होते. अद्यापही संस्थांची माहिती अद्ययावत करण्याचे प्रलंबित असल्याचे संचालनालयाच्या निदर्शनास आले आहे.

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली व कौंसिल ऑफ आर्कीटेक्चर, नवी दिल्ली यांच्याकडुन मान्यताप्राप्त संस्थांमधील, अभियांत्रिकी पदविका व वास्तुकला पदविका अभ्यासक्रमांच्या प्रथम फेरी च्या सुरुवातीपर्यंत म्हणजेच (दिनांक ३०.०६.२०२५) पर्यंत संलग्नता प्राप्त अभ्यासक्रमांचा समावेश केंद्रीभुत प्रवेश प्रकियेत करुन, प्रवेश प्रक्रिया सुरु करण्यास संदर्भाधीन शासन पत्रान्वये मान्यता मिळालेली आहे. तद्नंतर संलग्नता मिळणाऱ्या संस्थांचा समावेश प्रवेश प्रकियेच्या वेळापत्रकानुसार उपलब्ध असलेल्या फेरीत करण्यास व त्यानंतर संलग्नता मिळणाऱ्या संस्थांना संस्थास्तरावर प्रवेश करण्यास शासनाने परवानगी दिली आहे. त्यानुसार पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांचे प्रवेश उपरोक्तप्रमाणे करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

त्याअनुषंगाने, आपणांस कळविण्यात येते की, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली व कौंसिल ऑफ आर्कीटेक्चर, नवी दिल्ली यांच्याकडुन मान्यताप्राप्त संस्थांमधील पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांसाठी शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता संबंधित शिखर परिषदेची मान्यता, शासन मान्यता, त्यानुसार संबंधित विद्यापीठाची संलग्नता / समकक्षता प्रदान केल्याची माहिती अद्ययावत करुन दि.१ जुलै २०२५ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत ऑनलाईन पध्दतीने सादर करावी. कोणत्याही संस्थेची माहिती अद्ययावत करणे प्रलंबित राहिल्यास व त्यामुळे संस्थेचा समावेश केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या पहिल्या फेरीमध्ये न झाल्यास, त्याची संपूर्ण जबाबदारी संस्थेची राहील. तसेच, मंजूर प्रवेश क्षमतेची माहिती ही प्रवेश प्रक्रियेदरम्यान जागा वाटपात दर्शविण्यात येणार असल्याने सदर माहितीत कोणतीही चूक झाल्यास व पर्यायाने प्रवेश प्रक्रियेमध्ये काही अडचण उद्भवल्यास त्यास संबंधित संस्थेचे प्राचार्य सर्वस्वी जबाबदार राहतील.

(डॉ. विनोद मोहितकर)
संचालक,
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत : १) मा.अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीसाठी सादर.
२) मा.आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित

३) कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठ यांना कळविण्यात येते की, शासन पत्रातील निर्देशांचे पालन करुन संलग्नता समकक्षता प्रदान करण्याच्या अनुषंगाने उचित कार्यवाही विहीत कालमर्यादेत करावी. तसेच, विद्यापीठाकडून संस्थाना संलग्नता प्रदान करण्याबाबतची कार्यवाही दि.०१ जुलै २०२५ दुपारी २.०० वाजेपर्यंत करावी.

४) सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, नागपूर, नाशिक व पुणे
त्यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रक आपण आपल्या स्तरावरुन आपल्या अधिनस्त सर्व पदवी व पदव्युत्तर पदवी संस्थांच्या निदर्शनास आणून द्यावे. पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थांनी सादर केलेली माहिती पडताळणी करुन व अचूक माहिती प्रमाणित करुन संकेतस्थळावर दि.०२ जुलै २०२५ सायं ५.०० वाजेपर्यंत अद्ययावत करावी व त्याबाबतचा अंतिम अहवाल संचालनालयास सादर करावा.

५) अध्यक्ष / सचिव, सर्व विद्यमान व्यावसायिक तांत्रिक पदवी, पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था, यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.

६) कार्यासन अधिकारी, का. क. ३, मुख्य कार्यालय, मुंबई यांना कळविण्यात येते की, विभागीय कार्यालयांकडून पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या विद्यमान संस्थांची प्रमाणित केलेली माहिती राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना सादर करण्याबाबत आवश्यक कार्यवाही करावी.